श्री सुहास एकनाथ बोरुडे, तत्का कनिष्ठ सहाय्यक (लि) ग्रामपंचायत विभाग, जिल्हा परिषद अहिल्यानगर यांनी कार्यालयीन कामी हलगर्जिपणा केलेने शिस्तभंगाची कारवाई करणे बाबत..

जिल्हा परिषद अहिल्यानगर
सामान्य प्रशासन विभाग-१
जिल्हा परिषद आदेश जा.क्र.साप्रवि-१/आस्था-३/८२३१९३२/३९/२०२६
अहिल्यानगर दिनांक - स्वाक्षरी खाली नमुद केले प्रमाणे

वाचा:- १. इकडील निलंबन आदेश क्र.साप्रवि-२/आस्था/३४/२०२१ दिनांक ०१/०३/२०२१
२. इकडील दोषारोप पत्र क्र साप्रवि-१/आस्था-३/६३२/२०२१ दिनांक ०६/०९/२०२१
३. श्री.बोरुडे सुहास एकनाथ, सेवा निलंबित कनि.सहा. यांचा खुलासा दि. १६/०९/२०२१
४. इकडील अंतिम कारणे दाखवा नोटिस जा. क्र.साप्रवि-१/आस्था-३/८५३/२०२१ दिनांक १२/१०/२०२१
५. श्री.बोरुडे सुहास एकनाथ, कनि सहा, पं.स. जामखेड यांचा खुलासा दि. २२/१०/२०२१
६. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ४ (२)

श्री सुहास एकनाथ बोरुडे, हे कनिष्ठ सहाय्यक (लिपीक) या पदावर ग्रामपंचायत विभाग, जिल्हा परिषद अहिल्यानगर येथे कार्यरत असताना कार्यालयीन कामकाजात हलगर्जीपणा व कार्यालयीन कामी विनापरवानगी कार्यालय प्रमुख यांची पुर्वपरवानगी न घेता स्वतःच्या अधिकारात वेळोवेळी गैरहजर राहून गैरवर्तन केलेने श्री बोरुडे यांना संदर्भ क्रमांक १ अन्वये सेवा निलंबित करणेत आलेले होते.

संदर्भ क्रमांक २ नुसार श्री बोरुडे यांना ज्ञापन दोषारोपपत्र बजावणेत येऊन खुलासा सादर करणेत बाबत कळविणेत आले होते. संदर्भ क्र.३ नुसार श्री बोरुडे यांनी खुलासा सादर करुन त्यांचेवर ठेवणेत आलेले चारही आरोप मान्य केलेले होते. श्री बोरुडे यांनी दोषारोप मान्य केलेने श्री बोरुडे हे महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील तरतुदीनुसार शिस्तभंगाची कारवाईस पात्र ठरत असल्याने महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ४ (२) च्या तरतुदीनुसार श्री बोरुडे यांच्या दोन वेतनवाढी कायमस्वरुपी थोपविणेची शिक्षा अंतिम का करु नये? या बाबत अंतिम कारणे दाखवा नोटीस बजावणेत येऊन खुलासा सादर करणे बाबत कळविणेत आले.

श्री सुहास एकनाथ बोरुडे, कनिष्ठ सहाय्यक, यांनी संदर्भ क्रमांक ५ नुसार खुलासा सादर केलेला आहे. श्री सुहास बोरुडे यांनी त्यांचेवर ठेवणेत आलेले दोषारोप मान्य केलेने कार्यालयीन कामकाजात हलगर्जीपणा व कार्यालयीन कामी अनाधिकृत गैरहजर राहिलेने महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वर्तणुक) नियम १९६७ मधील नियम ३ चा भंग केलेला आहे. यावरुन श्री सुहास एकनाथ बोरुडे हे शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र ठरत असल्याचे नियुक्ती प्राधिकारणाचे मत झालेले आहे. सबब श्री बोरुडे यांचा खुलासा अमान्य करणेत येत आहे. श्री सुहास एकनाथ बोरुडे यांनी महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वर्तणुक) नियम १९६७ मधील नियम ३ चा भंग केलेने महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ४ (२) नुसार, त्यांची पुढील वेतनवाढ भविष्यकालीन वेतनवेतनवाढीवर कायमस्वरुपी परिणाम होईल अशारितीने दोन वर्षाकरीता थोपविणे ही शिक्षा या आदेशाव्दारे अंतिम करण्यात येत आहे.

..२

सदर आदेशाची नोंद श्री सुहास एकनाथ बोरुडे, कनिष्ठ सहाय्यक, पंचायत समिती जामखेड यांच्या मुळ सेवापुस्तकात घेणेत यावी.

सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषद www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक 202601280400030 असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 28-01-2026 11:04:11

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

**श्री सुहास एकनाथ बोरुडे, कनिष्ठ सहाय्यक, पंचायत समिती जामखेड**

द्वारा व प्रत:- गट विकास अधिकारी, पंचायत समिती जामखेड

२/- सदरचा आदेश श्री सुहास एकनाथ बोरुडे, कनिष्ठ सहाय्यक, पंचायत समिती जामखेड यांना बजावून दुस-या प्रतीवर त्यांची स्वाक्षरी घेवून या कार्यालयास सादर करावी व सदर आदेशाची नोंद संबधितांच्या मुळ सेवापुस्तकात घेण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास तात्काळ सादर करावा.

प्रत:- निवड नस्ती